# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट च्या जवाहरलाल नेहरु पोर्ट, तालुका उरण, जिल्हा – रायगड येथील विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी)(पहिली सुधारणा) विनियम, २०२३

### प्रारुप अधिसूचना

**विद्युत अधिनियम, २००३**

**क्र.मविनिआ/तांत्रिक/ परवाना अटी/जेएनपीए/२०२३/---- :** विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या जवाहरलाल नेहरु पोर्ट, तालुका उरण, जिल्हा – रायगड येथील विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१८ (मुख्य विनियम) या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ :-**

१) या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट च्या जवाहरलाल नेहरु पोर्ट, तालुका उरण, जिल्हा – रायगड येथील विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी)(पहिली सुधारणा) विनियम, २०२३" असे म्हणावे.

२) हे विनियम शासकीय राजपत्रात ज्या दिनांकास प्रसिध्द होतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. मुख्य विनियमांच्या विनियम २.१ (इ) मध्ये सुधारणा:-**

मुख्य विनियमांमधील विनियम २.१ (इ) खालीलप्रमाणे बदलण्यात येईल, जसे की :-

**"जेएनपीटी"** म्हणजे जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट जे मुख्य बंदर ट्रस्ट अधिनियम, १९६३ अंतर्गत नोंदणीकृत झालेले मुख्य बंदर आहे आणि ज्यांना भारत सरकारच्या

वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, वाणिज्यिक विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र कक्ष), उद्योग भवन, नवी दिल्ली यांनी दि. ११ ऑगस्ट, २०१४ च्या अधिसूचना क्र. एस. ओ. २०४७ (ई) अन्वये सवरकहर, कराळ, सोनारी आणि जसखार, तालुका उरण, जिल्हा- रायगड येथील विशेष आर्थिक क्षेत्रासाठी विकासक म्हणून मान्यता दिलेली आहे आणि त्यांच्या नावातील बदलाच्या परिणामस्वरुप, याचा अर्थ आणि संदर्भानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे, त्यामध्ये (१) द मेजर पोर्ट ऑथॉरिटी अधिनियम, २०२१ द्वारे द मेजर पोर्ट ट्रस्ट अधिनियम, १९६३ चे निरसन, (२) जवाहरलाल नेहरु पोर्ट ऑथॉरिटीच्या संचालक मंडळाने मेजर पोर्ट ऑथॉरिटी अधिनियम, २०२१ नुसार दि. २६ मे, २०२२ रोजी "जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट"चे नाव "जवाहरलाल नेहरु पोर्ट ऑथॉरिटी" असे बदलण्यास मान्यता दिल्याचा ठराव आणि (३) विकास आयुक्त, सिप्झ एसइझेड यांनी दि. १९ जानेवारी, २०२३ रोजी दिलेली मान्यता, यांच्या अनुषंगाने 'जवाहरलाल नेहरु पोर्ट ऑथॉरिटी' यांचा समावेश राहील.

डॉ. राजेंद्र गं. आंबेकर
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई,
दिनांक : -- जूलै, २०२३.

**सूचनाः** 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट च्या जवाहरलाल नेहरु पोर्ट, तालुका उरण, जिल्हा – रायगड येथील विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१८', *शासकीय राजपत्रात* दिनांक १३ नोव्हेंबर, २०१८ रोजी अधिसूचित करण्यात आले होते.